**<u>प्रेसनोट</u>** **दि. 25/11/2025**

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस हवालदार यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे परिक्षेत्र** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | वाघोली पोलीस स्टेशन, जि. पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | महिला, वय 33 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | परमेश्वर मानिक पाखरे, वय 37 वर्षे, पद- पोलीस हवालदार ब.नं. 7827, नेमणुक- वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर मूळ पत्ता - गणेश नगर, मदर मेरी सोसायटी जवळ,आव्हाळवाडी रोड,वाघोली,पुणे, वर्ग :- 3 |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 5,000/- (पाच हजार रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 5,000/- (पाच हजार रूपये)** |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | **रू. 5,000/- (पाच हजार रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 25/11/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 25/11/2025 |
| **ठिकाण** | वाघोली पोलीस स्टेशन समोर, वाघोली |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती सर्वदा सावळे, पोलीस निरीक्षक, ला प्र वि,पुणे. (मो.क्र. 8275458733) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती भारती मोरे, सहा.पोलीस आयुक्त, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 98701565886) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचे पतीसोबत पटत नसल्याने सन 2015 मध्ये तक्रारदाराने पोटगी मिळण्यासाठी मा.विटा कोर्टात दावा दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये ऑक्टोबर 2024 मध्ये मा.कोर्टाने तक्रारदाराच्या बाजूने निकाल देऊन सन 2015 पासून प्रति महिना 5000 अशी पोटगी देण्याचे आदेश दिले आहेत. परंतु तक्रारदाराच्या पतीने पोटगी दिली नसल्याने तक्रारदाराने पुन्हा संबंधित कोर्टात अर्ज दाखल केला असता मा.कोर्टाने तक्रारदाराच्या पतीच्या नावाने त्याचेकडे थकीत पोटगीची रक्कम 6,65,000/- ही वसुली करण्यासाठी जप्ती व विक्री चे वॉरंट जारी केले. सदर वॉरंट तक्रारदाराने स्वतः वाघोली पोलीस ठाण्यात आणून दिले असता यातील आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार पाखरे यांनी वारंट बजावून रिपोर्ट देण्यासाठी तक्रारदाराकडे 5,000/- रुपये लाचेची वारंवार मागणी करून लाच न दिल्यास वॉरंट बजावण्यात येणार नसल्याचे सांगितल्याची तक्रार तक्रारदार यांनी 24/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. 25/11/2025 रोजी वाघोली पोलीस ठाण्याचे आवारात पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार पाखरे यांनी तक्रारदारांचे मा. विटा कोर्टाने तक्रारदार यांच्या पतीच्या नावाने काढलेले रक्कम रू.6,65,000/- चे वसुली करण्यासाठीचे रिकव्हरी वॉरंटची बजावून रिपोर्ट देण्याकरीता 5,000/- रुपयाच्या लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.25/11/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान 12:09 वा. वाघोली पोलीस ठाण्याचे समोर पुणे अहिल्यानगर रोडवर चहाच्या टपरीवर येथे आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार परमेश्वर पाखरे यांनी तक्रारदाराकडून 5,000/- रुपयाची लाच पंचासमक्ष स्वीकारली असता रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

वरील आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध वाघोली पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे)**, 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.